महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

२ रा मजला, प्रकाशगड, वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी २६४७४२११ फॅक्स २६४७६९४९

क्र.महानिर्मिती/आ.अ.मा.सं.२/र व का/ दिनांक :-

## *प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ६० दिनांक १६-०८-२००८*

***विषय :-*** महानिर्मिती कंपनीच्या अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या सरासरी वेतनी रजा (अर्जित रजा) साठविण्याची कमाल मर्यादा वाढविणेबाबत.

------------------------------------

तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सर्वसाधारण आदेश क्रमांक १८ (कर्मचारीवर्ग) दिनांक २८-०५-१९६३ अन्वये मंडळाच्या कर्मचा-यांना लागू असलेले सेवाविषयक (वर्तणूक, शिस्त व अपीलासह) विनियम अधिसूचित करण्यात आलेले आहेत. मंडळाचे पुर्नरचनेनंतरही सदर विनियम महानिर्मिती कंपनीतील कर्मचा-यांना लागू आहेत. सदर विनियमाच्या परिशिष्ट 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये समाविष्ट असणारे कर्मचारी (म्हणजे वेतनगट १, २, ३ व ४ मधील कर्मचारी) सेवाविनियम क्रमांक ४३, ४४ व ४५ मधील तरतूदीनुसार सरासरी वेतनी रजा मिळण्यास पात्र आहेत. सरासरी वेतनी रजा साठवणूकीची सध्याची कमाल मर्यादा २४० दिवस इतकी आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक अरजा/२४०१/८/सेवा-९ दिनांक १५-०१-२००१ अन्वये शासकीय कर्मचा-यांकरिता अर्जित रजा साठवणूकीची कमाल मर्यादा २४० दिवसावरुन ३०० दिवस इतकी केल्यामुळे महानिर्मिती कंपनीच्या कर्मचा-यांनाही सरासरी वेतनी रजा साठवणूकीची कमाल मर्यादा २४० वरुन ३०० दिवस इतकी वाढविण्याबाबतचा प्रस्ताव महानिर्मिती कंपनीच्या विचाराधीन होता.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक १ दिनांक १९-१०-२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा. व्यवस्थापकीय संचालक (महानिर्मिती) यांनी संचालक (संचलन), संचालक (निर्मिती प्रकल्प) व संचालक (वित्त) यांचेशी विचार विनिमय करुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवा विनियमातील सेवा विनियम क्रमांक ४३, ४४ व ४५ मध्ये योग्य त्या ठिकाणी खालील प्रमाणे तरतूदीत अंशत: बदल करण्यास मंजूरी दिली आहे.

(i) महानिर्मिती कंपनीच्या सेवाविनियमातील परिशिष्ट 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये समाविष्ट असणा-या वेतनगट १, २, ३ व ४ मधील अधिकारी/कर्मचारी यांना सेवाविनियम क्रमांक ४३, ४४ व ४५ नुसार अनुज्ञ ेय असलेल्या सरासरी वेतनावरील रजा (अर्जित रजा) साठविण्याची कमाल मर्यादा २४० दिवसांवरुन ३०० दिवसांपर्यंत वाढविण्यात यावी.

(ii) सरासरी वेतनावरील रजा (अर्जित रजा) साठविण्याची कमाल मर्यादा सध्या ज्या ज्या प्रसंगी/प्रकरणी लागू आहे, त्या सर्व प्रकरणी हे परिपत्रक जारी केल्याच्या तारखेपासून लागू करण्यात येईल.

सेवा विनियम क्रमांक ४३, ४४ व ४५ मधील इतर तरतूदी अबाधीत राहतील.

***मुख्य महाव्यवस्थापक(मासं)***

***प्रति***

महानिर्मिती कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*cmahagenco.doc*